## निशाणी क्रमांक ०१ वर आदेश

१. अर्जदारांनी प्रस्तूतचा अर्ज हा बॉम्बे रेग्युलेशन अधिनियम, १८२७ चे कलम–२ नुसार वारस प्रमाणपत्र (Heirship certificate) मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

२. अर्जदारांची थोडक्यात हकीकत अशी की, अर्जदार क्र.१ आनंद धनराज वरटकर हा मयताचा मुलगा, अर्जदार क्र.२ विवेक धनराज वरटकर हा मयताचा मुलगा, अर्जदार क्र.३ सुनिता धनराज वरटकर ही मयताची पत्नी व अर्जदार क्र.४ गिरजाबाई महादेव वरटकर ही मयताची आई आहे. मयत **धनराज महादेव वरटकर** यांचे दि.०१/०४/२०२४ रोजी ऑरेंट सिटी हॉस्पीटल, नागपूर, तह.जि.नागपूर येथे निधन झाले आहे. मयतास उपरोक्त वारस असून इतर कोणीही वारस नाहीत. अर्जदारांनी शासकीय कामकाजाकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

३. सदर प्रकरणात कोणाची काही हरकत आहे का ? याबाबत जाहीर प्रगटन निशाणी क्र.१७ वर 'दैनिक मराठी महाविदर्भ' या वर्तमानपत्रात दि.२९ डिसेंबर, २०२५ रोजी प्रसिध्द करण्यात आले होते. परंतु, अद्याप सदर प्रकरणात कोणाचीही काहीएक हरकत प्राप्त झाली नाही.

४. अर्जदार क्र.१ आनंद धनराज वरटकर यांनी अर्जातील कथनांच्या पुष्ट्यर्थ निशाणी क्र.१० वर पुराव्याचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. अर्जदाराने सदर शपथपत्रामध्ये प्रस्तुत अर्जातील संपूर्ण मजकुराचा समावेश केलेला आहे. उपरोक्त वारसदार हेच मयताचे एकमेव वारस आहेत व त्यांच्याशिवाय इतर वारस नाहीत, असे नमुद केले आहे. अर्जदाराने मयताच्या मृत्यू प्रमाणपत्राची प्रमाणित प्रत निशाणी क्र.११ वर दाखल केली आहे. त्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की,मयत **धनराज महादेव वरटकर** यांचे दि.०१/०४/२०२४ रोजी ऑरेंज सिटी हॉस्पीटल, नागपूर, तह.जि.नागपूर येथे निधन झाले आहे. परंतु, सदर प्रमाणपत्रात मृतकाचा कायमस्वरुपी पत्ता शिवाजी नगर, भद्रावती, तह.भद्रावती, जि.चंद्रपूर असा नमूद असल्याचे दिसून येते. अर्जदाराने मृतक धनराज महादेव

वरटकर तसेच अर्जदार क्र.१ ते ४ यांच्या आधार कार्डच्या पडताळणी प्रती नि.क्र.१२ ते १६ वर, पेपरमध्ये प्रकाशीत जाहीरनाम्याचे बिल नि.क्र.१८ वर अभिलेखावर दाखल केले आहे. अर्जदाराने नि.क्र.१९ वर पुरसीस दाखल करून पुरावा बंद केला आहे.

५. अर्जदाराने दिलेल्या पुराव्यास कोणीही आव्हान दिलेले नाही. त्यामुळे अर्जातील कथनावर अविश्वास ठेवण्याचे कोणतेही कारण नाही. उपरोक्त वारसदारांचे मयताशी असलेले नातेसंबंध विचारात घेता असे दिसून येते की, उपरोक्त वारसदार हेच मयताचे कायदेशीर वारस आहेत. त्यामुळे अर्ज मंजूर करणे योग्य व न्यायोचित आहे. सबब, मी पुढील आदेश करीत आहे;

## आदेश

१) अर्ज मंजूर करण्यात येतो.

२) अर्जदार क्र.१ **आनंद धनराज वरटकर**, अर्जदार क्र.२ **विवेक धनराज वरटकर**, अर्जदार क्र.३ **सुनिता धनराज वरटकर** व अर्जदार क्र.४ **गिरजाबाई महादेव वरटकर** हे मयत **धनराज महादेव वरटकर** यांचे वारस असल्याचे घोषीत करण्यात येते.

३) सिव्हील मॅन्युअल प्रकरण–१४ मधील परिच्छेद–३१२ प्रमाणे मूळ वारस प्रमाणपत्रावर टीप नमूद करावी.

४) अर्जदाराने आवश्यक ते मुद्रांक शुल्क भरल्यानंतर वारस प्रमाणपत्र देण्यात यावे.

(आदेश खुल्या न्यायालयात जाहीर केला असे.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by JARUDE ASHWINI SHRIKANT
Date: 2026.04.09 18:43:07 +0530

**(ए.एस. जरुदे)**

दिनांकः– ०९/०४/२०२६. दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), भद्रावती